
# भरधाव एस.टी.च्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

### शेकापुर शेतशिवारात भीषण अपघात; वरुड पोलिसांत गुन्हा दाखल





महासागर | प्रतिनिधी

**वरुड ( दि. 14 ) :** सुरळी ते चांदस दरम्यानच्या शेकापुर शेतशिवाराजवळ 13 सप्टेंबर रोजी रात्री झालेल्या भीषण अपघातात वाठोडा (पुनर्वसन) येथील 55 वर्षीय विठ्ठलराव चंपतराव चवडे यांचा जागीच मृत्यू झाला. भरधाव व अनियंत्रित एस.टी. बसने विरुद्ध दिशेने येणाऱ्या त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला.

विठ्ठलराव चवडे हे शहरातील इंदिरा चौकात माँ शेरावाली डूम सप्लायर्स अँड प्लास्टिक आयटम्स नावाचे दुकान चालवत होते. रोजप्रमाणे शनिवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास दुकान बंद करून एमएच 31 एएक्स 8780 क्रमांकाच्या दुचाकीने वाठोड्याकडे निघाले होते. यावेळी नागपूरहून वरुडकडे येत असलेली एमएच 20 जीसी 3884 क्रमांकाची एस.टी. बस भरधाव वेगात येऊन त्यांच्या दुचाकीला धडकली. अपघात एवढा भीषण होता की, चवडे यांचा जागीच मृत्यू झाला. अपघात होताच रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांनी पोलिसांना व रुग्णवाहिकेला माहिती दिली. जमाव वाढू लागल्याचे पाहून एस.टी. बसचालकाने बस थेट पोलिस स्टेशनमध्ये आणून जमा केली. दरम्यान, वरुड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व मृतदेह ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविला. या प्रकरणी वरुड पोलिसांनी संबंधित एस.टी. बसचालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. विठ्ठलराव चवडे यांच्या मृत्यूमुळे चांदस व वाठोडा गावांमध्ये शोककळा पसरली. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार सोमवारी चांदस येथे होणार आहे.

# कचऱ्याच्या ढिगावर बसून आंदोलन





- रिंग रोडवरील वाहतूकही अडविली
- कचरा प्रकरणात नागरिक आक्रमक

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 14 )** कठोरा मार्गावरिल रिंगरोड क्रॉसीग वर तयार करण्यात आलेल्या अनधिकृत डंपिंग ग्राउंड विरोधात नागरिकांनी आज रविवारी (दि.14) टोकाची भूमिका घेतली. नागरिकांनी सकाळपासून रिंग रोडवरिल वाहतूक अडवून कचऱ्याच्या ढिगावर बसून जोरदार आंदोलन केले. पाच ते सहा वर्षांपासून सुरु असलेल्या या प्रकाराचा उद्रेक झाल्याने परिसरात एकच खळबळ माजली होती.

या परिसरातील नागरिकांनी गेल्या अनेक वर्षांपासून मनपा प्रशासनाकडे वारंवार निवेदन दिले होते, पण परिणामकारक तोडगा काढल्या जात नव्हता. छोट्या-मोठ्या आंदोलनांनंतरही कचरा ढीग तसाच राहिला होता. त्यामुळे भाजपचे पदाधिकारी धीरज बारबुद्धे यांनी मनपा आयुक्तांसोबत संपर्क साधला. मात्र काहीच प्रतिसाद मिळाला नसल्याने स्थानिकांनी नाइलाजास्तव रस्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. यावेळी अजय देशमुख,अमोल गिरी, सुधीर भाऊ अढाऊ, चंचल देशमुख, संभाजी कुलट, यश बहिरम, सुनील अढाऊ, उज्वल ठाकरे, कमलेश कडू, किशोर नवले, शाम माथुरकर, नितीन बोबडे, डॉ.तराळ, राजेंद्र लांडे, ज्योत्स्ना देशमुख, हेमा अढाऊ, सीमा वनवे, सरिता कडू, जयश्री घुरडे, योगिता गिरी, अनुश्री मोरे, अर्पिता सुपाशे, वैशाली वाखेकर, ज्योती नेमाडे. सोनाली नांदुरकर, माथुरकर, नवले, पुनम होले, प्रदीप बाजड, प्रशांत धर्माळे, मिलिंद चिमोटे, धीरज बारबुद्धे आणि अनेक नागरिकांनी या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. स्थानिक रहिवासी आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी रस्त्यावर बसून आणि कचऱ्याच्या ढिग्यावर बसून निषेध व्यक्त केला.

## आमदारांनी दिले समाधानकारक आश्वासन

वाढता रोष पाहता अमरावती विधानसभा आमदार सुलभाताई खोडके यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. त्यांनी त्वरित कचरा उचलण्याचे, अरुंद रस्त्याचे रुंदीकरण करावे, आणि कचऱ्याचे इतरत्र वळवून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, असे स्पष्ट निर्देश दिले. मनपा आयुक्तांनीही



फोनवरून या समस्येचे शाश्वत समाधान करण्याचे आश्वासन दिले.

## पावसातही आंदोलन

या आंदोलनादरम्यान मुसळधार पाऊस सुरु झाला. मात्र नागरिकांनी न हटता आपली ठाम भूमिका कायम ठेवली. पोलीस प्रशासनाने आंदोलन मागे घेण्याचा आग्रह केला, पण आंदोलकांनी मनपा आयुक्त येईपर्यंत आंदोलन थांबवणार नाही असा निर्धार केला.

नागरिकांनी या आंदोलनातून स्पष्ट केले की, कचरा हा केवळ आरोग्याचा धोका नाही, तर अपघात घडण्याचे कारणही आहे. गेल्या काही वर्षांत येथे आठ ते दहा लोकांचा जीव गमावला गेला आहे. म्हणून प्रशासनाने तत्काळ आणि स्थायी उपाययोजना कराव्यात. त्यांनी शासन व मनपा प्रशासनाला निषेधाची मुदत दिली आणि समस्या कायमचे सुटावी, अशी मागणी केली.

## मोर्शी तहसील येथे विशेष रस्ता अदालत

**मोर्शी :** मोर्शी तहसील कार्यालयात नुकतीच विशेष रस्ता अदालत पार पडली. यामध्ये 200 विवादित प्रकरणातील 290 पक्षकारांनी उपस्थित राहून आपल्या तक्रारींचे निराकरण करून घेतले. तहसील कायार्लय मोर्शी येथे उपविभागीय अधिकारी प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सागर ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच निवासी नायब तहसीलदार विनोद वानखेडे आणि महसूल नायब तहसीलदार चारुदत्त पाटील यांच्या उपस्थितीत काल विशेष रस्ता अदालत आयोजित करण्यात आली. या अदालत मध्ये मामलेदार कायद्यानुसार तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 च्या कलम 143 नुसार शेत रस्त्यांबाबत प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन त्यांचे मार्गदर्शनात्मक निराकरण करण्यात आले. यावेळी एकूण 200 विवादित रस्ता प्रकरणांमधील 290 पक्षकार हजर होते. या रस्ता अदालतचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे शेतकऱ्यांमध्ये रस्त्यांबाबत उद्भवणारे वाद दीर्घकाळ चालू न ठेवता आपसी तडजोडीने निकाली होय असे या निमित्ताने तहसीलदार सागर ढवळे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

# बुलडोजरने घर पाडले; पंधरा लाखांचे नुकसान

### राजापेठ ठाण्यात गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 14 ) :** दस्तुरनगर येथील गल्ली क्रमांक 3 मध्ये जुन्या घराच्या मालकी हक्काच्या वादातून अखेर घरावरच बुलडोजर फिरवण्यात आला. या प्रकारात घरमालकाचे तब्बल 15 लाख रुपयांचे नुकसान झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणात फिर्यादी संजय अर्जुनदास तरडेजा (वय 44, रा. द्वारकानाथ कॉलनी, अमरावती) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गैरअर्जदाराविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. संजय अर्जनदास तरडेजा हे बिझिलँड परिसरात कपड्याचा व्यवसाय करतात.

त्यांचे दस्तुरनगरातील जुने घर काही महिन्यांपासून रिकामे होते. पूर्वी भाड्याने दिलेल्या या घरामागील भागात शेजारी संजयकुमार कल्लुमल मंथान राहत होते. दरम्यान संजय तरडेजांनी द्वारका कॉलनीत नवे घर घेतले. त्यामुळे ते नवीन घरात गेले आणि जुने घर भाड्याने दिले. त्यानंतर चार ते पाच महिन्यापूर्वी त्यांचे घर खाली होते. परंतू दहा ते पंधरा वर्षांपासून या घराच्या मालकी हक्कावरून संजय तरडेजांचे मंथानसोबत वाद सुरू होता. दरम्यानच 20 जून 2024 रोजीही तरडेजांच्या नातेवाईकांनी फोन करून सांगितले की, तुमचे घर तोडत आहे. त्यामुळे त्यांनी तत्काळ जुन्या घरी धाव घेतली, त्यावेळी काही मजूर हे घर तोडत होते. तर त्यांच्या घरात अतिक्रमण करून गैरअर्जदार राहत होते. त्यामुळे तरडेजांनी पोलिसांना बोलाविले.

त्यानंतर घर पाडण्याचे बंद करण्यात आले. त्यानंतर तरडेजांनी गैरअर्जदाराची तहसिल कार्यालयात तक्रार सुध्दा दिली. त्यावेळी त्यांना माहिती झाले की, गैरअर्जदार यांनी स्वताऱ्च्या नावाने सातबारा बनविला आहे. त्यानंतर 14 सप्टेंबर रोजी तरडेजांना भाच्याने फोन करून सांगितले की, दस्तुरनगरमधील त्यांचे घर बुलडोजरने पाडण्यात येत आहे.

## आयटीआय प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

**मोर्शी :** दहावीनंतर रोजगार व स्वयंरोजगाराची त्वरित संधी उपलब्ध करून देणारे शिक्षण म्हणजे आयटीआय. विद्यार्थ्यांचा कल बघता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोर्शी आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था वरुड येथे प्रवेशापासून वंचित राहिलेल्या उमेदवारांना प्रवेशाची विशेष संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

# माडू नदीत तरुण वाहून गेला

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि. 14 ) :** शहरातील खोलवाटपुरा येथील 18 वर्षीय तरुण माडू नदीच्या पात्रात वाहून गेल्याची घटना शनिवारी (13 सप्टेंबर) दुपारी तीनच्या सुमारास घडली. वाहून गेलेल्या तरुणाचे नाव कुणाल किशोर बागडे (रा. खोलवाटपुरा, मोर्शी) असे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बारावीचे शिक्षण घेत असलेला कुणाल किशोर बागडे हा मोर्शी व नेरपिंगळाई येथील दोन मित्रांसह सालबर्डी-आठनेर मार्गावरील अमराई येथे मौजमजेकरिता गेला होता. तेथे वाहणाऱ्या माडू नदीच्या पात्रात पोहण्यासाठी उतरल्यावर तो पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. या घटनेनंतर 13 सप्टेंबर रोजीच कुणाल घरून बाहेर पडून परतला नसल्याची तक्रार मोर्शी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. त्यानुसार पोलिसांनी मिस्सिंगचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. दरम्यान, अमरावती व बैतूल येथील बचाव पथकांना घटनास्थळी बोलावण्यात आले.

## बचाव पथकाचे प्रयत्न निष्फळ

रविवारी (14 सप्टेंबर) सकाळपासून दोन्ही पथकांनी संयुक्तरित्या शोधमोहीम हाती घेतली. मात्र कसोशीने शोधूनही कुणालचा काहीच मागमूस लागला नाही. अमराई हे ठिकाण मध्यप्रदेशातील आठनेर पोलीस स्टेशन हद्दीत येत असल्यामुळे पुढील तपास आठनेर पोलीस करीत आहेत.

# अतिरिक्त आयुक्तांच्या घरी अडीच लाखांची चोरी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती ( दि. 14 )** शहरातील गणेडीवाल लेआउट येथील निर्मल कलश अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या विभागीय आयुक्त कार्यालयातील ॲडिशनल कमिश्नर यांच्या फ्लॅटमध्ये अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत तब्बल 2 लाख 57 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रामदास देविदास सिध्दभट्टी (वय 57) हे विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे ॲडिशनल कमिश्नर पदावर कार्यरत आहेत. ते गेल्या महिनाभरापासून वैद्यकीय रजेवर पुण्यात मुलाकडे राहायला गेले होते. दरम्यान, 13 सप्टेंबर रोजी रात्री 8 वाजता शेजारी राहणारे अनिल पानोडे यांनी फोनवर संपर्क साधून फ्लॅटच्या दरवाज्याचा कडी-कोंडा तुटलेला असून चोरी झाल्याची माहिती दिली. यानंतर सिध्दभट्टी हे तात्काळ पुण्यावरून अमरावतीत आले. त्यांनी फ्लॅट उघडून पाहिले असता आतले सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. बेडरूममधील लाकडी कपाट उघडे दिसले तर लोखंडी लॉकर जबरदस्तीने फोडलेले होते. त्यांनी घराची पाहणी केली असता अंदाजे 2 ते 2.5 लाख रुपये रोख रक्कम, सुमारे 3 हजार रुपयांचे नाणी, तसेच काही कपडे, ब्लँकेट व शर्ट गायब असल्याचे दिसून आले. या घटनेनंतर एकूण 2 लाख 57 हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची नोंद करण्यात आली आहे.

# अप्पर वर्धा धरणात युवकाचा आत्महत्येचा प्रयत्न

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि. 14 )** अप्पर वर्धा धरणात एका 37 वर्षीय युवकाने पुलावरून नदीपात्रात उडी घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र, धरण परिसरात आलेल्या युवकांनी तत्काळ त्याला बाहेर काढून जीव वाचवला. या घटनेत युवकाच्या नाकात-तोंडात पाणी गेल्याने तो बेशुद्ध झाला होता. ही घटना आज रविवारी 14 सप्टेंबर रोजी सकाळी 11 वाजताच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, जयहरी गुलाबराव निकम (37, रा. आसोना, ता. मोर्शी) हा युवक धरणाचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी आला होता. त्याने पुलावरून नदीत उडी घेतली. पाण्यातून काठावर येताच काही युवकांनी त्याला खेचून बाहेर काढले. तत्काळ माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण चिंचोले, रामकिसन नांदगावकर, पो.कॉ. वैभव ठाकरे व अथर्व कोहळे घटनास्थळी पोहोचले. युवकाला उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथे दाखल करण्यात आले. प्रथमोपचारानंतर परिस्थिती गंभीर असल्याने त्याला जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे हलवण्यात आले. विशेष म्हणजे नदीत उडी घेण्याआधी त्याने पॅन्टमधील मोबाईल व पैशांचे पाकीट बाजूला ठेवले होते. त्यामुळे हा प्रकार आत्महत्येचा प्रयत्न होता की केवळ पोहण्याचा, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. दरम्यान, धरणातील पाणी विसर्गाची माहिती अशी की, 12 सप्टेंबर रोजी रात्री 9 वाजता धरणाचे सर्व 13 दरवाजे प्रत्येकी 40 से.मी.ने उघडण्यात आले होते व त्यातून 844 घनमीटर/सेकंद वेगाने पाणी सोडण्यात आले होते. मात्र, पाण्याची आवक घटल्याने आज 14 सप्टेंबर रोजी केवळ पाच दरवाजे 20 से.मी.ने उघडे असून 162 घनमीटर/सेकंद विसर्ग सुरू आहे. रविवार सुट्टीमुळे मोठ्या प्रमाणावर पर्यटकांनी धरण परिसर गजबजला होता. घटनास्थळ आष्टी पोलीस स्टेशन हद्दीत येत असल्याने पुढील तपास तेथील पोलिस करीत आहेत.

## वृद्धाचा मृतदेह आढळला

मोर्शी आठवडी बाजार परिसरात रविवार 14 सप्टेंबर रोजी सकाळी 9 वाजता एका 65 वर्षीय वृद्धाचा मृतदेह आढळला. मृतकाचे नाव मधुकर जाणे (रा. खंबीत बेलोरा, ता. मोर्शी) असे आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मृतक आपल्या कुटुंबापासून विभक्त राहात होते व हलकी-फुलकी कामे करून उदरनिर्वाह करीत होते. ते व्यसनाधीन असल्यानेच मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनेची माहिती मिळताच पो. हे.कॉ. निरंजन उकंडे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृतदेह उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथे पाठवून शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. पुढील तपास ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# नवरात्र उत्सवाची तयारी सुरु

## एकविरा देवी मंदिरात चांदीच्या आभूषणांची विशेष स्वच्छता

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 14 ) :** श्री अंबादेवी आणि श्री एकविरा देवी हे अमरावती शहराचे ग्रामदैवत असून नवरात्रोत्सवाच्या पर्वापूर्वी मंदिरात विशेष तयारी सुरू आहे. यंदा श्री एकविरा देवी मंदिरात चांदीच्या सर्व आभूषण आणि वस्तूंची खास स्वच्छता करण्यात येत आहे.

**सुवर्णकार बांधवांची सेवा**

शहरातील सुवर्णकार बांधव साठ वर्षांपासून नवरात्रीच्या काळात मंदिरात देवीची सेवा म्हणून चांदीचे आभूषण स्वच्छ करून देतात. रविवारी अष्टमीच्या पर्वावर सकाळी 10 वाजल्यापासून संपूर्ण दिवसभर हा पवित्र कामधाम मोठ्या उत्साहात पार पडला.



श्री एकविरा देवी मंदिर संस्थेच्या विश्वस्थांच्या उपस्थितीत चांदीची आभूषणं व विविध भांडी पुजाऱ्यांनी सभागृहात आणली. यावेळी सर्व साहित्याची नोंद करून सुवर्णकार बांधवांना सुपूर्द करण्यात आली.

प्रथम वस्तूंना गरम पाणी आणि आसूद मिश्रीत पाण्यात स्वच्छ धुवून नंतर विशिष्ट ब्रशने घासून साफ करण्यात आले. स्वच्छ वस्तूंना कोरड्या मऊ कपड्याने पुसून चमकविण्यात आले. शिवाय, वस्तूंची फायर टेस्टद्वारे शुद्धतेची पडताळणीही करण्यात आली.

### स्वच्छ करण्यात आलेली चांदीची वस्तू

- उत्सव मूर्ती
- पादुका, गदा, खड्ग
- चवरंग, पाट, नक्षीकाम असलेले ताट
- निरंजन, संधपात्र, आचलणी, गडू, चंवर
- दिवे, धूपर्ण, हळदी, कुंकव
- पाळ, वाट्या, समई, कलश, मिखवटे
- गळ्यातील दागिने, झुंबर, बकेट, गंगाळ, छत्री

### तपासली जाते सोन्याची शुद्धता

काही सुवर्णकार फायर टेस्टद्वारे दागिन्यांची शुद्धता तपासत होते. काहीजण गरम पाण्यातून वस्तू धुण्याचं काम करत होते, तर काहींनी ॲसिड मिश्रीत पाण्यातून वस्तू काढून थोड्या वेळाने साध्या पाण्यात धुण्याचं काम पार पाडले. ब्रशने वस्तूंची घासणी करून नंतर मऊ कपड्यांनी स्वच्छ आणि चमकदार बनविण्यात आल्या. ही तयारी नवरात्रीच्या उत्सवाला सज्ज करण्यासाठी अत्यंत निष्ठेने केली जात आहे.श्री एकविरा देवी मंदिरात या पारंपरिक सेवेमुळे धार्मिक वातावरण अधिक भक्तिमय होत आहे.

# पंतप्रधानांना कुंकवाच्या डब्या पाठवून निदर्शने




## शिवसेना महिला आघाडीचे आंदोलन

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 14 )** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने आज 'माझं कुंकू, माझं देश' हे अभिनव आंदोलन जिल्हाभरात राबविण्यात आले. आंदोलनात महिलांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना कुंकूच्या डब्या पाठवत केंद्र सरकारच्या धोरणाविरुद्ध आपला निषेध व्यक्त केला.

या वेळी हिंदुस्तान-पाकिस्तान क्रिकेट सामना खेळण्याचा निषेध करण्यात आला. महिला आघाडीच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली हजारो महिलांनी सहभागी होऊन 'जय भवानी जय शिवाजी', 'हिंदुस्तान जिंदाबाद, पाकिस्तान मुर्दाबाद' अशी घोषणा देऊन केंद्र सरकारच्या धोरणांविरुद्ध आवाज उठवला. आंदोलनाचे नेतृत्व प्रतिभा बोप शेट्टी, मनीषा टेंबरे, ज्योती अवघड, सृष्टी वाघमारे आणि अलका पारडे यांनी केले. आंदोलनामध्ये भारतात झालेल्या पहलगाम आतंकवादी हल्ल्यात देशातील 26 नागरिकांचे बलिदानाचे स्मरण करून त्याच्या विरोधात ठसा उमठवण्यात आला. केंद्र सरकारने अशा वेळी पाकिस्तानसोबत क्रिकेट सामना खेळण्याची परवानगी दिल्याचा कटु प्रश्न उपस्थित करण्यात आला. कुंकूच्या डब्या पंतप्रधान नरेंद्र मोदींना पाठवून जनतेच्या भावनांशी खेळणाऱ्या धोरणांविरुद्ध एक संदेश दिला गेला. शिवसेना महिला आघाडीचे सह संपर्क प्रमुख प्रतिभा बोपशेट्टी, जिल्हा संघटिका मनीषा टेंबरे, शहर प्रमुख राजेश्री जटाळे, कांचन ठाकूर, वैशाली विधाते, जयश्री कुरेकर, वंदना घुगे, वर्षा बोडे, शिवसेना शहरप्रमुख प्रवीण हरमकर, जिल्हाप्रमुख मनोज कडू आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# बिच्छन नदीच्या गुडघाभर खोल पाण्यातून अंत्ययात्रा

## स्मशानभूमीला रस्ता नसल्याने ग्रामस्थांची वेदनादायक अवस्था



महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर, (दि.14)**– अचलपूर पंचायत समिती अंतर्गत गौरखेडा कुंभी येथील बौद्ध समाजाच्या स्मशानभूमीला आजही रस्ताच नाही. अंत्ययात्रा थेट बिच्छन नदीपात्रातून गुडघाभर पाण्यातून उचलून न्यावा लागतो, अशी अत्यंत वेदनादायक व अमानवीय परिस्थिती ग्रामस्थांना आजही सहन करावी लागत आहे. स्थानिक ग्रामस्थांनी यापूर्वी ग्रामपंचायत, लोकप्रतिनिधी, पंचायत समिती तसेच आमदार–खासदार यांच्याकडे वेळोवेळी तक्रार मांडली; मात्र अद्याप कोणत्याही पातळीवर उपाययोजना झालेली नाही. परिणामी बौद्ध समाजातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

> स्मशानभूमीसाठी शासनाने जागा निश्चित केली आहे, परंतु तिकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याने ग्रामस्थांना अंत्यसंस्काराच्या वेळी प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. नदीपात्रातून मृतदेह नेण्यासारखी लज्जास्पद व दु:खद घटना अन्यायकारक आहे. शासनाने आणि प्रशासनाने तातडीने पावले उचलली पाहिजेत.
>
> **धर्मेंद्र सदांशीव,**
> **तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, गौरखेडा कुंभी.**

### मृतदेहाची अवहेलना

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, स्मशानभूमीकडे जाणारा किमान 150 ते 200 मीटरचा रस्ता डांबरी अथवा खडीचा करून द्यावा व जिथं नदी पात्र आहे तेथे उंच पुलाची व्यवस्था करावी जेणेकरून अंत्यसंस्काराच्या वेळी मानवी सन्मान अबाधित राहील व मृतदेहाची अवहेलना होणार नाही.

### ग्रामस्थांमध्ये संताप

ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि संबंधित लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप वाढत असून, तातडीने ठोस निर्णय न झाल्यास मोर्चा व आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.




# पथदिवे दिवसाही पेटते, रात्री मात्र अंधार

## महानगरपालिकेचा अजब कारभार

महासागर | प्रतिनिधी





महासागर | प्रतिनिधी

**बडनेरा,(दि.14)** : महानगरपालिकेच्या बडनेरा झोनमधील नागरिकांना अनेक महिन्यांपासून रस्ते दिव्यांच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. या भागातील पथदिवे अनेकदा रात्री बंद राहतात. विशेष म्हणजे रात्री जेव्हा खरंच दिव्यांची गरज असते तेव्हा हे दिवे बंद असतात, परतू दिवसा हेच दिवे पेटलेले दिसतात. नागरिकांनी छायाचित्रांसह अनेक वेळा तक्रारी करूनही संबंधित अधिकारी आणि महापालिकेच्या झोन कार्यालयाकडून कोणतीही दखल घेतली जात नाही.

रात्री अंधारामुळे रस्त्यावर अपघातांचा धोका वाढतो. काही ठिकाणी महिलांना, विद्यार्थ्यांना व ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करताना भीती वाटते. चोरी, अपघात व गुन्हेगारीला आमंत्रण देणारी ही परिस्थिती असून, प्रशासन झोपेत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

नागरिक म्हणतात, महानगरपालिकेला वारंवार सांगूनही कुणी ऐकत नाही. रात्री अंधार, दिवसा दिवे पेटलेले दिसतात. यामध्ये सार्वजनिक निधीचा उघडपणे अपव्यय होतो आहे. यासाठी जबाबदार अधिकारी कोण? महानगरपालिकेच्या या अजब कारभारामुळे संतापलेल्या जनतेने आता लोकप्रतिनिधींनी या विषयाकडे लक्ष द्यावे, अशी मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.



# पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्याविरोधात युवकांचा 'एकता मार्च'

## गणपती शोभायात्रेत वादाच्या नावाखाली दाखल केला गुन्हा

**बडनेरा/अंजनगाव बारी, (दि. 14) :** गणपती विसर्जन शोभायात्रेच्या निमित्ताने बडनेरा शहरातील गणपती मंडळावर पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचा निषेध व्यक्त करत सर्व गणपती मंडळे व गावकऱ्यांनी बडनेरा पोलिस ठाण्यावर मोठा 'हिंदूशक्ति एकता मार्च'काढला. सविस्तर वृत्तानुसार, 6 सप्टेंबर 2025, अनंत चतुर्थीच्या दिवशी बडनेरा शहरातील नवीवस्ती परिसरात सर्व गणपती मंडळांनी विसर्जन शोभायात्रा काढली. बडनेरा येथील लड्ढा प्लॉट येथील वीर राणा गणेश उत्सव मंडळ यांनी आपल्या शोभायात्रेत साउंडवर श्री हनुमान चालीसा वाजविले. मात्र, काही हिंदू उत्सव विरोधी तत्त्वधारकांनी या धार्मिक कार्यक्रमाविरोधात तक्रार करत गणपती मंडळांचा शोभायात्रा मार्ग बदलण्याची अनुचित मागणी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडे केली. पोलिसांनी या प्रकरणाचा ताबा घेत वीर राणा मंडळाविरुद्ध बजरंग गणेश उत्सव मंडळाचा मार्ग रोखल्याचे आरोप करून गुन्हा दाखल केला. यामुळे बडनेरा शहर व दोन्ही मंडळांमध्ये अविश्वास व संभ्रम निर्माण झाला. अशा परिस्थितीत बडनेरा नगरवासी व विविध गणपती, नवदुर्गा उत्सव मंडळांनी एकत्र येऊन संपूर्ण हिंदू समाजाच्या एकतेचा संदेश देण्यासाठी सायंकाळी आठ वाजता मोठ्या संख्येने 'हिंदूशक्ति एकता मार्च'काढला. यावेळी नागरिकांनी पोलिसांच्या अनुचित कारवायीचा निषेध केला व प्रशासनाने त्वरित खोट्या आरोपाची चौकशी करून निष्पक्ष निर्णय घेण्याची मागणी केली.

> **नागरिकांचा पोलीसविरोधी आंदोलन**

# तहसील कार्यालयात रेती डंपरची वाढती गर्दी

## जप्त वाहनांची अडचण कधी दूर होणार? | नागरिकांचा सवाल

महासागर | प्रतिनिधी

**वरूड, (दि. 14) :** तहसील कार्यालयाच्या आवारात जप्त केलेल्या रेतीच्या गाड्या, डंपर व ट्रकची गर्दी वाढतच जात आहे. अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करताना प्रशासनाने हे वाहनं जप्त केली आहेत, पण आता या वाहनांमुळे कार्यालयात येणाऱ्या–जाणाऱ्या नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.



शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह कार्यालयीन कामकाजासाठी येणाऱ्या नागरिकांना जप्त वाहनांमुळे अडथळे येत आहेत. कार्यालयाच्या मुख्य दरवाजाजवळ व परिसरात जागेअभावी वाहनांची गर्दी वाढल्यामुळे अपघाताची शक्यता वाढली आहे. विशेषत: डंपर अनेक दिवस तशाच उभ्या असल्यामुळे धूळ, घाण व दुर्गंधी पसरली असून नागरिक त्रस्त झाले आहेत.

तहसील कार्यालय हे लोकांच्या कामकाजाचे ठिकाण आहे की जप्त वाहनांचे डेपो? हे वाहन किती दिवस तहसील कार्यालयातच उभे राहणार? यावर प्रशासनाने त्वरित स्पष्टीकरण द्यावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे. नियम व कायद्याप्रमाणे तातडीने या वाहनांवर कार्यवाही करावी अथवा वेगळ्या सुरक्षित जागी ठेवण्याची व्यवस्था करावी, अशीही मागणी नागरिकांनी केली आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. अन्यथा, विरोधी आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# महसूल विभागाचे सेवा पंधरवाडा अभियान सुरू

## शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी विशेष उपक्रम

महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर, (दि. 14)** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस (17 सप्टेंबर) आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती (2 ऑक्टोबर) या काळात महसूल विभागाने 'सेवा पंधरवाडा' अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव आणि तहसीलदार डॉ. संजय गरकल यांनी तहसील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. या उपक्रमांतर्गत महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी गावोगावी जाऊन थेट नागरिकांशी संवाद साधून शेतकरी, गरजू नागरिक आणि प्रलंबित प्रकरणे मार्गी लावणार आहेत. उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव व तहसीलदार डॉ. संजय गरकल यांनी नागरिकांना या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणात लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# निर्मिती पब्लिक स्कूलचा पूर्णा माय स्वच्छता अभियान

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, (दि. 14) :** समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम म्हणून निर्मिती पब्लिक स्कूल तर्फे 'पूर्णा माय स्वच्छता अभियान' मोठ्या उत्साहात राबविण्यात आले. गणपती विसर्जनानंतर पूर्णा नदीच्या काठावर मूर्ती अवशेष, फुलांचा कचरा आणि विविध प्रकारचा घाण मोकळ्या रस्त्यावर विखुरलेला दिसत होता. या समस्येकडे लक्ष देत शाळेने 'निसर्गाचे रक्षण, पर्यावरणाचे संवर्धन'हा नवीन संकल्प घेऊन अभियान राबविले.

संस्थेचे अध्यक्ष भास्कर टोम्पे यांच्या प्रेरणेतून आणि मुख्याध्यापक तुषार खोंड यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी धडाडीने सहभागी झाले. नदीकाठी स्वच्छता मोहीमेत प्रत्यक्ष हात घालून कचरा गोळा करण्यात आला. क्रीडा शिक्षक सुयोग गोरले, शिवानी तेलखडे, साक्षी सपकाळ, वर्षा अढाऊ, सुमित राऊतकर, नामदेव उईके, वैभव तायडे, अनुप ठाकरे आणि इतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगितले.



या मोहिमेद्वारे विद्याथ्यामध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली. त्यांनी 'स्वच्छता ही फक्त सरकारी जबाबदारी नाही, प्रत्येकाची जबाबदारी आहे'असा संदेश संपूर्ण तालुक्यात प्रसारित केला. निर्मिती पब्लिक स्कूलचे ब्रीदवाक्य 'माझी शाळा ङ्क सुंदर शाळा, माझा समाज–स्वच्छ समाज' या संदेशाचे प्रभावीपणे पालन करण्यात आले.

# योगेश कोल्हे यांच्या पदोन्नतीची नोंद नाही

## प्रवीण हरमकर यांनी केली चौकशीची मागणी | आयुक्तांच्या स्वाक्षऱ्यासुद्धा खोट्या असल्याचा आरोप

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.14)** महानगरपालिका विभागातील चपराशी पदावर कार्यरत असलेले तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गंभीर प्रकरणात पकडण्यात आलेले योगेश कोल्हे यांना पदोन्नती देण्यात आली. ही पदोन्नती बनावटी असून आयुक्तांचे हस्ताक्षर सुद्धा खोटे असल्याचा आरोप युवासेना जिल्हाप्रमुख प्रवीण हरमकर यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला. योगेश कोल्हे यांच्या पदोन्नतीची सामान्य प्रशासन विभागात नोंद नसल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.




श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये प्रवीण हरमकर यांनी सांगितले की, योगेश कोल्हे हे चपराशी पदावर असताना आयुक्तांच्या केबिन मध्येच काम करायचे. यादरम्यान त्यांनी त्यांची पदोन्नती कनिष्ठ लिपिक या पदावर करून घेतले दरम्यान त्यांना अँटीकरप्शन विभागाने भ्रष्टाचाराच्या प्रकरणात पकडले होते. त्यांनी खोट्या सह्या घेऊन आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाचा गैर कारभार राबविला असल्याचा आरोप प्रवीण हरमकर यांनी केला. त्यानंतर 2023 मध्ये त्यांना कनिष्ठ लिपिक अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आले. मात्र त्यांना वारंवार मिळालेल्या पदोन्नत्या संदर्भात कुठल्याही प्रकारची नसती ही सामान्य प्रशासन विभागाकडून चालविण्यात आली नसल्याचे पत्र वरिष्ठ लिपिक सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने माहितीच्या अधिकारात देण्यात आले त्यामुळे योगेश कोल्हे यांच्या कागदपत्रांची चौकशी व्हावी अशी मागणी प्रवीण हरमकर यांनी केले आहे. पत्रकार परिषदेमध्ये प्रवीण हरमकर यांच्यासोबत गोविंद दायमा, जुगल देव, प्रमोद वानखडे, मनीष रामावत, रुपेश आलेकर, कमलेश गुप्ता, निकेश शर्मा, नाना नागमोते, संदीप मानेकर, चंद्रशेखर गिरी, विनोद भंडारकर, राजश्री जगदाळे, वैशाली विधाते, पंजाबराव तायवडे, रामा सोळंके उपस्थित होते.

# धाडस, सेवा आणि कर्तृत्वाचा गौरव

## बेनोड्यात बालकृष्ण गणेश उत्सव मंडळाचा सत्कार सोहळा

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, (दि. 14) :** धाडस, सेवाभाव आणि कर्तृत्व यांचा संगम असलेला अविस्मरणीय सत्कार समारंभ दि. 6 सप्टेंबर रोजी बेनोडा येथील गुजरी बाजार चौकात बालकृष्ण गणेश उत्सव मंडळातर्फे पार पडला. या कार्यक्रमात गावातील मान्यवरांचा शाल–श्रीफळ व बक्षिस देऊन गौरव करण्यात आला.

सर्वाधिक हृदयस्पर्शी क्षण ठरला तो जगदीश मासोदकर यांचा सत्कार. ॲड.नीरज टावरी यांचा चिमुकला मुलगा आरव पेठ येथील पुलावरून पाण्यात पडला होता. खोल पाण्यात जीव धोक्यात असताना, क्षणाचाही विचार न करता जगदीशने पाण्यात उडी घेतली आणि मुलाचे प्राण वाचवले. त्यांच्या या धाडसी



कृतीमुळे एका निरागस जीवाला पुनर्जन्म मिळाला. या शौर्यगौरवाबद्दल मंडळाच्यावतीने त्यांचा शाल, श्रीफळ आणि अकरा हजार रुपयांच्या रोख बक्षिसासह सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात डॉ. व्ही.आर.अढाऊ यांची अष्टविनायक संस्थेच्या अध्यक्षपदी झालेली निवड व त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून गावासाठी केलेली सेवा लक्षात घेऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. बेनोडा पोलिस ठाण्याचे नवीन ठाणेदार विवेक देशमुख यांचे आगमन झाल्याने त्यांचाही सत्कार करून गावाच्या कायदा–सुव्यवस्थेसाठी त्यांच्या कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच अक्षय चोरे यांची ग्राम महसूल अधिकारी म्हणून झालेली निवड ही गावासाठी अभिमानाची बाब ठरल्याने त्यांचाही मान्यवर सन्मान करण्यात आला. या भव्य सोहळ्याचे अध्यक्षस्थान ठाणेदार विवेक देशमुख यांनी भूषविले. कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वी पार पाडण्यासाठी मंडळातील कार्यकर्ते श्याम चोरे, राम चोरे, प्रफुल गावंडे, रोशन लाड, अंकुश निंभोरकर, मनोज टावरी, पंकज गोहाड, अमोल गोहाड, तेजस फरकाडे, अश्वेघ चोरे, हार्दिक पापडकर, मनोज चोरे, आयुष चोरे, सुनिल पुंड यांनी परिश्रम घेतले. हा सोहळा गावाच्या सामाजिक जीवनात धाडस, सेवा व कर्तव्यभावना या मूल्यांना अधोरेखित करणारा ठरला.

# महापालिकेतील डॉक्टरचा 'लांडगा आला रे आला'!

## स्वच्छता विभागात राजीनामा, स्वेच्छानिवृत्ती नौटंकी | प्रशासनाची डोकेदुखी वाढली



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.14) :** महानगर पालिकेमध्ये स्वच्छतेसारख्या जबाबदारीचे घोंगडे फेकून वारंवार राजीनामा, स्वेच्छानिवृत्ती घेण्याची नौटंकी करणारा हा डॉक्टर प्रशासनाची डोकेदुखी बनला आहे.

महानगरपालिकेच्या या डॉक्टरचे वर्तन व कारभार दोन्ही गेल्या काही काळापासून सतत चर्चेत आहे. प्रत्येकवेळी नवीन आयुक्त पदभार स्विकारतात, तेव्हा हा अधिकारी वारंवार राजीनामा, स्वेच्छानिवृत्ती किंवा बदलीची मागणी करत वारंवार नाट्यमय भूमिका करतो. या डॉक्टरांचा 'लांडगा आला रे आला' प्रकारामागील हेतू आता स्पष्ट होताना दिसत आहे. सदर अधिकारी स्वत:ची जबाबदारी टाळून पदाचा गैरफायदा घेत असल्याचे प्रशासनाच्या लक्षात आले आहे.

### महापालिकेत ओरड

अधिकारी नेहमीच तब्येतीच्या कारणावरुन राजीनामा देण्याचा बहाणा करतो, पण प्रत्यक्षात ते कामकाजातून पळ काढत असून, अनधिकृत आर्थिक लाभ घेत असल्याचे समोर आले आहे. डॉक्टर कार्यालयीन कामकाजात तो नेहमी नकारार्थी भूमिका घेतो. विभागात सुधारणा घडवायची वेळ आली की, अडथळा निर्माण करण्याचे त्याचे मुख्य काम करतो, सहकाऱ्यांविरुद्ध अफवा पसरवणे आणि वरिष्ठांपुढे चुकीची माहिती देणे या वर्तनामुळे विभागात तणावाचे वातावरण निर्माण झाले असल्याची ओरड महापालिकेत सुरु आहे.

### झारीतील शुक्राचार्यावर कारवाई कधी?

स्वच्छतेसारख्या महत्वाच्या कामात अधिकारीच गैरप्रकारात गुंतले तर शहराची स्वच्छता कशी राखली जाईल? प्रशासनानेही हे वर्तन गैरजबाबदार आणि संशयास्पद आर्थिक कारभाराचे द्योतक मानले आहे. प्रशासनाचे मत आहे की, या अधिकाऱ्यामुळे विभागाचा वेग मंदावला असून कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे या अधिकारीची तातडीने बदली आवश्यक असल्याचा ठाम सूर प्रशासनाकडून उमटला आहे. त्यामूळे महापालिकेतील झारीतील या शुक्राचार्याची चौकशी करुन त्यावर योग्य कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# संत बेंडोजी बाबा विद्यालय प्रथम, अतुल जगताप विद्यालय द्वितीय

## तालुका स्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धा

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, (दि. 14) :** पंचायत समिती व विज्ञान नाट्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान नाट्य स्पर्धेचे आयोजन राजर्षी शाहू महाविद्यालय येथे उत्साहात पार पडले. या स्पर्धेत एकूण 9 महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. यात बेंडोजी बाबा विद्यालयाने प्रथम येत जिल्ह्यावर जाण्याचा मार्ग मोकळा केला आहे.



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अतुल जगताप विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप तळोकार उपस्थित होते. तर परीक्षक म्हणून विषयतज्ञ विवेक राऊत व डॉ. पी. आर. सरदार यांनी नाट्यांचे परीक्षण केले. विज्ञान जिल्हा समन्वयक श्रीनाथ वानखडे व आंधळे यांनीही या उपक्रमाला विशेष उपस्थिती दर्शवली.

मानव कल्याणासाठी विज्ञान व तंत्रज्ञान या विषयाला घेऊन स्पर्धकांनी दर्जेदार नाट्यकृती सादर केल्यात या स्पर्धेत संत बेंडोजी बाबा विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला, तर अतुल जगताप विद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच कारला येथील खरबडे विद्यालय यांनी तृतीय क्रमांकावर आपली नोंद केली. प्रथम क्रमांक पटकावलेल्या चमूला आता जिल्हास्तरावर स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह आहे. नाट्य कृतीसाठी शाळेचे शिक्षक यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन तालुका विज्ञान मंडळाचे अध्यक्ष प्रताप बोदीले यांनी केले. या विज्ञान नाट्य स्पर्धेतून विद्यार्थ्यांची सृजनशीलता, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि सामाजिक जाणीव यांना उत्तेजन मिळाल्याचे परीक्षकांनी सांगितले.

